| | | | | |
|---|---|---|---|---|
| MHSN050036912022 | दाखल दिनांक | १०/१०/२०२२ | | |
| | नोंद दिनांक | १०/१०/२०२२ | | |
| | न्यायनिर्णय दिनांक | २८/०७/२०२३ | | |
| | कालावधी | वर्ष | महिने | दिवस |
| | | ०० | ०९ | १८ |

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी (न्यायालय क्र.३), इस्लामपूर यांचे न्यायालय**

(पिठासीन अधिकारी प्रदिपसिंह पृथ्वीराजसिंह ठाकूर)

(दिनांक २८/०७/२०२३)

**(नियमित फौजदारी खटला क्र.३४१/२०२२)** **नि.क्र.१९**

अपराधः भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ३२४, ३२३, ५०४ व ५०६ सह कलम ३४ अन्वये

| | |
|---|---|
| **फिर्यादी**<br>**[अभियोग पक्ष]** | **महाराष्ट्र सरकार तर्फे**<br>इस्लामपूर पोलीस ठाणे, इस्लामपूर.<br>ता. वाळवा, जि. सांगली. |
| **विद्वान सहा. सरकारी अभियोक्ता** | **श्री. के. ए. कोळी** |
| **आरोपी** | **श्रीयुग ज्ञानदेव ताटे**<br>व.व.१८, व्यवसाय–शिक्षण<br>रा. इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली |
| **आरोपीतर्फे विद्वान विधिज्ञ** | **श्री. व्ही. एस. काईंगडे** |

## भाग–ब

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | १५/०६/२०२२ |
| फिर्याद दाखल दिनांक | १५/०६/२०२२ |
| दोषारोपपत्र पाठविल्याचा दिनांक | १०/१०/२०२२ |
| दोषारोप निश्चित केल्याचा दिनांक | १७/०१/२०२३ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | २६/०७/२०२३ |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखून ठेवल्याचा दिनांक | २८/०७/२०२३ |
| न्यायनिर्णय दिनांक | २८/०७/२०२३ |
| न्यायनिर्णयातील शिक्षेसंदर्भात आदेशाचा दिनांक | निरंक |

## आरोपीची माहिती

| आरोपी क्र. | आरोपीचे नांव | अटक दिनांक | जामिनावर सोडल्याचा दिनांक | गुन्हयाचे कलम | अंतिम आदेश | शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ अन्वाये समायोजीत करण्याबाबत कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | श्रीयुग ज्ञानदेव ताटे | फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४१(अ)(१) प्रमाणे नोटस दिली | | भा.दं.वि., १८६० कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह ३४ अन्वये | निर्दोष मुक्त | निरंक | निरंक |

---

# न्या य नि र्ण य

(आज दिनांक २८/०७/२०२३ रोजी घोषीत)

आरोपीविरुध्द भारतीय दंड विधान, १८६० कलम ३२४, ३२३, ५०४ आणि ५०६ सह कलम ३४ अंतर्गत खटला चालविण्यात आला.

२. **अभियोगपक्षाचा खटला थोडक्यात असा की,**

फिर्यादी यशवंत दिनकर जावळे हे इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली येथे त्यांचे कुटूंबासोबत राहणेस आहे. घटनेच्या वेळी त्यांचा मुलगा ओंकार यशवंत जावळे हा इस्लामपूर हायस्कूल, इस्लामपूर येथे इयत्ता दहावीमध्ये शिक्षण घेत होता. घटनेच्या पुर्वी एप्रिल महिन्यात ओंकार व महमंदसाद शिकलगार यांचा एकमेकांकडे रागाने बघणेचे कारणावरुन किरकोळ वाद झाला होता व तो आपसांत मिटवलेला होता. त्यानंतर दिनांक १५/०६/२०२२ रोजी सकाळी १०.०० वा. चे सुमारास फिर्यादी कामानिमित्त बाहेर असताना, त्यांना ओंकार याच्या शाळेतून फोन आला की, ‘तुमच्या मुलांची भांडणे झाली असून, त्यास डोकीस मार लागला आहे'. त्यामुळे फिर्यादी यांनी जाऊन पाहिले असता, ओंकार याच्या डोकीस डावे बाजूस मार लागल्याने रक्त येत होते. तसेच ओंकारचा मित्र धैर्यशिल टिबे यास मानेवर व डावे हाताचे बोटावर साखळीने मारुन किरकोळ जखमी केले होते. ओंकार याचेकडे विचारपूस केली असता त्याने सांगीतले की, "तो सकाळी १०.०० वा. शाळेत गेला असता, महमंदसाद शिकलगार हा 'तू माझ्याकडे रागाने का बघतोस, तुला दाखवतोच’, असे म्हणून शाळेतून निघून गेला व त्यानंतर ११.०० वा. चे सुमारास महंमदसाद शिकलगार, श्रीशांत मंडले, श्री ताटे व एक अनोळखी मुलगा असे शाळेत आले. महंमदसाद शिकलगार याने धैर्यशिल यास शिवीगाळ करुन फायटरने मानेवर मारत असताना, त्याने त्यास हाताने आडवले असता

त्यास मानेवर व डावे हाताचे बोटाजवळ लागून तो किरकोळ जखमी झाला तसेच श्रीशांत मंडले याने त्याचे हातातील साखळीने धैर्यशील याचे मानेवर मारुन किरकोळ जखमी केले. त्यानंतर महंमदसाद, श्री ताटे व एक अनोळखी मुलगा असे ओंकार याच्या अंगावर धाऊन येऊन त्याला लाथा–बुक्क्यांनी मारहाण केली व श्री ताटे याने त्याचे हातातील चॉपरने ओंकार याच्या डोकीत डावे बाजूस मारुन जखमी केले." त्यामुळे फिर्यादीने आरोपीविरुध्द इस्लामपूर पोलीस ठाण्यात फिर्याद नोंद केली.

३. सदर फिर्याद वरुन पोलीसांनी आरोपीविरुध्द गुन्हा क्र. ३९७/२०२३ नोंदविला. सदर घटनेचा तपास सुरुवातीस पोलीस हवालदार श्री. पी. एस. पाटील यांच्याकडे व तदनंतर पोलीस हवालदार श्री. एस. ए. यादव यांच्याकडे सोपवण्यात आला. तपासादरम्यान त्यांनी साक्षीदारांचे जबाब नोंदविले, घटनास्थळ पंचनामा व जप्ती पंचनामा केला, जखमींची वैद्यकीय प्रमाणपत्रे हस्तगत केली. तपासाअंती पुरावा हाती आल्याने आरोपीविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

४. त्याप्रमाणे आरोपीविरुध्द नि.क्र.९ वर दोषारोप ठेवला, तो आरोपीस वाचून व समजावून सांगितला असता, आरोपीने गुन्हा नाकबूल केला व संपरिक्षणाची तयारी दर्शवली. आरोपीवरील दोषारोप सिध्द करण्याकरिता अभियोग पक्षातर्फे तीन साक्षीदारांना तपासले आहे. आरोपी व फिर्यादीतर्फे नि.क्र.१५ अन्वये संयुक्त तडजोड

पुरसीस दाखल करण्यात आली आहे.

## भाग–क

## अभियोगपक्ष/बचावपक्ष/न्यायालयीन साक्षीदारांची यादी

### अ. अभियोग पक्ष

| सा.क्र. | साक्षीदाराचे नांव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| १. | यशवंत दिनकर जावळे | फिर्यादी | १२ |
| २. | ओंकार यशवंत जावळे | जखमी व प्रत्यक्षदर्शी साक्षीदार | १३ |
| ३. | धैर्यशील सुनिल टिबे | जखमी व प्रत्यक्षदर्शी साक्षीदार | १४ |

५. आरोपीवरील दोषारोप सिध्द करण्याकरिता अभियोग पक्ष कोणताही लेखी अथवा तोंडी पुरावा अभिलेखावर आणू शकला नाही. त्यामुळे आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिता, कलम ३१३(१)(ब) प्रमाणेचे निवेदन नोंदविण्यात आले नाही. शेवटी सहाय्यक सरकारी अभियोक्ता व आरोपीतर्फे विधीज्ञांचा सविस्तर युक्तीवाद ऐकला. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद व अभिलेखावरील पुराव्यावरुन खालील मुद्दे माझ्या निदर्शनास आले. त्यावर मी माझ्या कारणमिंमासेसह खालीलप्रमाणे निष्कर्ष नोंदवित आहे:–

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दिनांक १५/०६/२०२२ रोजी ११.०० वा. चे सुमारास इस्लामपूर हायस्कूल, इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली येथे आरोपी श्रीयुग याने विधिसंघर्षीत बालकांशी | नकारार्थी |

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| | संगनमत करुन ओंकार यास चॉपरने व धैर्यशील यास साखळी या घातक हत्यारांनी मारहाण करुन इच्छापुर्वक दुखापत पोहोचवली व त्याद्वारे त्याने भारतीय दंड विधान, कलम ३२४ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले काय ? | |
| २. | वरील तारीख, वेळ व ठिकाणी आरोपी श्रीयुग याने विधीसंघर्षीत बालकांशी संगनमत करुन ओंकार यास लाथा–बुक्क्यांनी मारहाण करुन दुखापत पोहोचवली व त्याद्वारे त्याने भारतीय दंड विधान, कलम ३२३ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले काय ? | नकारार्थी |
| ३. | वरील तारीख, वेळ व ठिकाणी आरोपी श्रीयुग याने विधीसंघर्षीत बालकांशी संगनमत करुन साक्षीदारांस प्रक्षोभित केले जेणे करुन त्यांच्याकडून सार्वजनिक शांतता भंग व्हावी व त्याद्वारे त्यांनी भारतीय दंड विधान, कलम ५०४ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले काय ? | नकारार्थी |
| ४. | वरील तारीख, वेळ व ठिकाणी आरोपी श्रीयुग याने विधीसंघर्षीत बालकांशी संगनमत करुन साक्षीदार यांना फौजदारीपात्र धाकधपटशा केली व त्याद्वारे त्याने भारतीय दंड विधान, कलम ५०६ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले काय ? | नकारार्थी |

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| ५. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणेमिमांसा

***मुद्दा क्र.१ ते ४ करीताः–***

६. मुद्दे क्र.१ ते ४ हे एकमेकांशी निगडीत असल्याने कथनांची, प्रतिकथनांची व कारणामिमांसेची पुनरावृत्ती टाळण्याकरीता, मी वरील मुद्दे एकत्रीतरित्या चर्चेकरीता घेत आहे. प्रस्तूतच्या खटल्यामध्ये आरोपीविरुध्द गुन्हा शाबीत करणेसाठी अभियोग पक्षाने हे शाबीत करणे गरजेचे आहे की, आरोपी श्रीयुग याने विधिसंघर्षीत बालकांशी संगनमत करुन ओंकार यास चॉपरने व लाथाबुक्क्यांनी तसेच धैर्यशील यास साखळी या घातक हत्यारांनी मारहाण केली, तसेच त्यांना फौजदारीपात्र धाकधपटशा केली.

७. आरोपीवरील गुन्हा शाबीत करणेसाठी फिर्यादी यशवंत (साक्षीदार क्र.१) यांना तपासले आहे. परंतू त्यांनी अभियोग पक्षास कोणत्याही मुद्दयावर समर्थन केले नाही. त्यांनी त्यांच्या सरतपासात त्यांचा मुलगा पडल्याबाबत शाळेतून त्यांना फोन आल्याने, ते शाळेत गेले व मुलाला दवाखान्यात घेऊन गेले, त्यांचा मुलगा गाडीवरुन पडला होता, त्यामुळे त्याच्या डोक्याला दुखापत झाली होती व हाताला खरचटले होते, असे कथन केले आहे. फिर्यादीने अभियोगपक्षास समर्थन न केल्यामुळे अभियोग पक्षातर्फे त्यांना उलटतपासाच्या स्वरुपात बरीच उत्तरसुचक प्रश्ने विचारण्यात आली.

परंतू त्यातदेखील आरोपी व त्यांच्या मुलाचे भांडण होऊन त्याला व त्याचा मित्र धैर्यशिल यास मारहाण झालेबाबत शाळेतून फोन आल्याचे व स्पष्टपणे नाकारले आहे. सदर साक्षीदारास फिर्याद दाखवली असता, त्याने फिर्यादीमधील मजकूर नाकारला आहे. फिर्यादी यांनी त्यांची आरोपीसोबत न्यायालयाबाहेर तडजोड झालेचे मान्य केले.

८. ओंकार (साक्षीदार क्र.२) आणि धैर्यशील (साक्षीदार क्र.३) हे कथित घटनेचे पिडीत व जखमी साक्षीदार आहे. त्यामुळे त्यांचा पुरावा अभियोग पक्षाकरिता अत्यंत महत्वाचा होता. परंतू त्यांनी ते मोटारसायकलवरुन जात असताना पडल्यामुळे त्यांना जखमा झाल्याचे कथन करुन अभियोग पक्षास सहकार्य केले नाही. त्यामुळे अभियोगपक्षातर्फे त्यांना उलटतपासाच्या स्वरुपात बरीच सुचक प्रश्ने विचारण्यात आली. परंतू त्यात देखील सदर साक्षीदारांनी आरोपी श्रीयुग याने त्यांना फायटर, चॉपर व साखळी याने मारहाण केल्याची बाब साफ नाकारली आहे.

९. अभियोगपक्षाचे महत्वाचे साक्षीदार फिर्यादी यशवंत, साक्षीदार क्र.२ ओंकार आणि साक्षीदार क्र.३ धैर्यशील यांनीच अभियोग पक्षाच्या कथनास साथ न दिल्यामुळे सदर खटल्यात इतर साक्षीदार, तपासी अंमलदार, तसेच वैद्यकीय अधिकारी यांची साक्ष नोंदवण्यात आली नाही. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणातील फिर्याद सिध्द होवू शकली नाही. तसेच फिर्यादी व आरोपीतर्फे नि.क्र.१५ अन्वये संयुक्त तडजोड पुरसीस अभिलेखावर दाखल करण्यात आली आहे. यावरुन फिर्यादीस सदरचे प्रकरण पुढे

चालवायचे नसल्याचे दिसून येते. प्रस्तुत प्रकरणात आरोपीतर्फे घटनास्थळ पंचनामा निशाणी क्र. १६ तसेच जखमींचे वैदयकीय प्रमाणपत्र निशाणी क्र. १७ व निशाणी क्र. १८ मान्य करण्यात आले आहेत. परंतु आरोपीविरुध्द कुठलाही प्रत्यक्ष पुरावा समोर न आल्यामुळे त्याचे संबंध आरोपीशी जोडता येणार नाही. अभियोग पक्षाचे फिर्यादी व साक्षीदारांनी अभियोग पक्षास साथ न दिल्यामुळे आरोपीविरुध्द कुठलाही प्रत्यक्ष अथवा परिस्थितीजन्य पुरावा अभिलेखावर येऊ शकला नाही. आरोपीविरुध्द कोणताही पुरावा समोर न आल्यामुळे आरोपीने घटनेच्या दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने विधिसंघर्षीत बालकांशी संगनमत करुन ओंकार यास चॉपरने व लाथाबुक्क्यांनी तसेच धैर्यशील यास साखळी या घातक हत्यारांनी मारहाण केली, तसेच त्यांना फौजदारीपात्र धाकधपटशा केली, या बाबी पुराव्या अभावी सिध्द होवू शकल्या नाहीत. सबब, आरोपीविरुध्द भारतीय दंड विधान, कलम ३२४, ३२३, ५०४ आणि ५०६ सह कलम ३४ अन्वये गुन्हा सिध्द झाला नाही. म्हणून मी मुददा क्र.१ ते ४ चे उत्तर नकारार्थी देत आहे.

***<u>मुद्दा क्र.५ करिताः–</u>***

**१०.** मुद्दा क्र.१ ते ४ च्या नकारार्थी निष्कर्षास अनुसरुन आरोपीस भारतीय दंड विधान, कलम ३२४, ३२३, ५०४ आणि ५०६ सह कलम ३४ अन्वयेच्या गुन्हयातून निर्दोषमुक्त करणे न्यायोचित ठरते. तसेच प्रस्तूत प्रकरणातील जप्त मुद्देमाल एक गोलाकार स्टीलचे कडे व सायकलची चेन ही निरुपयोगी व मुल्यहीन असल्याने अपील कालावधीनंतर ती नियमाप्रमाणे नाश करणे व एक चाकू अपील कालावधीनंतर

जिल्हाधिकारी, सांगली यांचेकडे नियमाप्रमाणे विल्हेवाट लावण्याकरिता पाठविणे योग्य होईल. म्हणून मुद्दा क्र.५ करिता मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे :-

## आदेश

**१.** आरोपी श्रीयुग ज्ञानदेव ताटे याची भारतीय दंड विधान, कलम ३२४, ३२३, ५०४ आणि ५०६ सह कलम ३४ खालील शिक्षापात्र अपराधातून फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येते.

**२.** प्रस्तूत प्रकरणातील जप्त मुद्देमाल :

**अ)** एक गोलाकार स्टीलचे कडे व सायकलची चेन ही निरुपयोगी व मुल्यहीन असल्याने अपील कालावधीनंतर ते नियमाप्रमाणे नाश करणेत यावेत.

**ब)** एक चाकू अपील कालावधीनंतर जिल्हाधिकारी, सांगली यांचेकडे नियमाप्रमाणे विल्हेवाट लावण्याकरिता पाठविणेत यावा.

**३.** आरोपीचे वैयक्तीक बंधपत्र व जामीनपत्र रद्द करण्यात येतात.

**४.** आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७-अ अन्वये रुपये १५,०००/- चे बंधपत्र व जामीनपत्र नव्याने द्यावे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात टंकलिखीत करुन घोषीत करण्यात आला.)

PRADEEPSINGH PRUTHVIRAJSINGH THAKUR
Digitally signed by PRADEEPSINGH PRUTHVIRAJSINGH THAKUR
Date: 2023.08.04 11:23:23 +0530

इस्लामपूर.
दिनांक २८/०७/२०२३.

**(प्रदिपसिंह पृ. ठाकूर)**
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, इस्लामपूर.
(न्यायालय क्र.३)

**-:CERTIFICATE:-**

I affirm that the contents of this P.D.F. file, order are same word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | Sagar Anil Kate |
| Court Name | :- | Judicial Magistrate First Class (Court No.3), Islampur. |
| Date of decision | :- | 28/07/2023 |
| Order signed by PO. on | :- | 28/07/2023 |
| Order uploaded on | :- | 04/08/2023 |